Estd. 1962

"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठातील वेतन अनुदानित पदावरील **ज्यांची नियुक्ती ही दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्ती झालेली अशा कार्यरत असणाऱ्या** सर्व शिक्षक/शिक्षक समकक्ष/शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी, सर्वांना कळविण्यात येते की, राज्य शासनाने दिनांक २५ मे, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना/राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत कर्मचाऱ्याचा सेवा कालावधीत मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना कुटुंबनिवृत्तिवेतन आणि मृत्यू उपदान व रुग्णता सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-याला रुग्णता निवृत्तिवेतन आणि सेवानिवृत्ति उपदान तसेच सेवेतून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ति उपदान मंजूर करण्याबाबत शासनाने दिनांक २५ मे, २०२३ रोजी शासन निर्णय लागू केला आहे. सदरचा शासन निर्णय अकृषि विद्यापीठे, संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालये इ. यांना लागू केला आहे.

सदर शासन निर्णयामध्ये राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली अंतर्गत सध्या कार्यरत असलेल्या व यापुढे सेवेत नियुक्त होणारा कर्मचारी यांनी त्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास किंवा रुग्णता सेवानिवृत्त झाल्यास, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ प्रमाणे कुटुंब निवृत्तिवेतन किंवा रुग्णता निवृत्तिवेतन अनुज्ञेय करण्याबाबत **अथवा** राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रमाणली अंतर्गत त्याची कायम निवृत्तिवेतन लेखा क्रमांक (PRAN) मध्ये जमा असलेली संचित रक्कम निवृत्तिवेतन निधी विनियमक व विकास प्राधिकरण यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार अनुक्रमे कुटुंबास किंवा त्याला मिळण्याबाबतचा सोबतचा नमुना-२ मध्ये विकल्प कार्यालय प्रमुखाकडे सादर करण्याबाबतची तरतूद नमूद केली आहे.

तेव्हा राष्ट्रीय निवृत्तिवेतन प्रणाली लागू असलेल्या वेतन अनुदानित पदावरील **ज्यांची नियुक्ती ही दिनांक ०१/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्ती झालेली अशा कार्यरत असणाऱ्या** सर्व शिक्षक, शिक्षक समकक्ष यांनी आस्थापना पीजी विभागामध्ये तर शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांनी आस्थापना-१ विभागामध्ये विहीत नमुना -१ कुटुंबाचा तपशील, व नमुना -२ विकल्प फॉर्म प्रत्येकी तीन प्रतीत दिनांक २३/०६/२०२३ पर्यंत कार्यालयास जमा करावेत. नमुना -१ व २ परिपत्रकासोबत सादर करण्यात येत आहे.

**प्र.कुलसचिव.**

**जा.क्र.: एसयुके/आस्थापना-२/** 239

**दिनांक :** 19 JUN 2023

**प्रति,**

**सर्व संबंधित**

**प्रत-**

१. **सर्व अधिविभागप्रमुख,संचालक,समन्वयक, शिक्षक,प्रशासकीय अधिकारी सेवक.**
२. **मा. कुलगुरु,मा. प्र-कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ, मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालयास**
३. **इंटरनेट विभाग यांना पुढील कार्यवाहीस्तव- सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.**
४. **विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी/सेवक यांच्या निदर्शनास आणावे.**

.docx